आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील
विद्यार्थ्यांकरीता केंद्र पुरस्कृत
डॉ.आंबेडकर मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती
योजना राज्यात राबविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३७८/तांशि-४.
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०००३२.
दिनांक : ५ डिसेंबर, २०१८

१०२०
१४/१२/२०१८

वाचा : सचिव, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र
क्रमांक १०१६/०१/२०१८-BC-I, दिनांक २८/८/२०१८

**परिपत्रक :** आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता केंद्र पुरस्कृत डॉ.आंबेडकर मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना केंद्र शासन राबवित आहे. या योजनेच्या शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सुधारित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील संक्षिप्त तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

१) केंद्र शासन ही योजना आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील (EBC) इयत्ता १० वी नंतरचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वित्तीय सहाय्य व्हावे याकरीता राबवित आहे.

२) ही योजना भारताचे नागरीक असलेल्या सर्वसाधारण प्रवर्गाच्या (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागास प्रवर्ग वगळून) विद्यार्थ्यांकरीता लागू आहे.

३) या योजनेस पात्र होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये १.०० लाख पेक्षा जास्त नसावे.

४) ही योजना केवळ शासकीय संस्थांमध्ये इयत्ता १० वी नंतरच्या (इयत्ता ११ वी व १२ वी वगळून) मान्यता प्राप्त अभ्यासक्रमांकरीता लागू करण्यात आली आहे.

५) ही योजना कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपुरती मर्यादित आहे.

६) या योजनेखालील पात्र विद्यार्थ्यांने अन्य शिष्यवृत्तीचा लाभ घेता कामा नये.

७) या योजनेंतर्गत निर्धारित दराने परिरक्षण भत्ता (Maintenance allowance), अंध विद्यार्थ्यांकरीता वाचन भत्ता, विद्यापीठ अथवा संस्थांकडून आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे



आ. ३२२२
१२/१२/१८

ना-परतावा शुल्क, रुपये ९००/- प्रतिवर्षी मर्यादेपर्यंत अभ्यास दौरा खर्च व रुपये १०००/- पर्यंत शोध प्रबंध टायपिंग व प्रिटींग खर्च इत्यादीचा समावेश आहे.

८) या योजनेंतर्गत केंद्र शासन उपलब्ध निधीच्या मर्यादेपर्यंत सहाय्य देणार आहे. ही योजना संपूर्ण अभ्यासक्रमाच्या कालावधीकरीता लागू राहणार आहे.

९) या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांची समाधानकारक प्रगती व वर्तणूक यावर अवलंबून राहणार आहे.

१०) या योजनेसाठी प्रत्येक वर्ष मे-जून मध्ये जाहिरात देवून अर्ज मागविणे अपेक्षित आहे.

११) विद्यार्थ्यांने या योजनेच्या लाभासाठी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

२. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून ही योजना राज्यामध्ये राबविण्यात यावी. यां योजनेसाठी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता केंद्र शासनाकडे विहित नमुन्यात निधीची मागणी संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई व संचालक, उच्च शिक्षण यांनी तातडीने करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई,
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे

प्रत :
आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय ,महाराष्ट्र राज्य ,मंत्रालय ,मुंबई
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये
सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण विभागीय कार्यालये
संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय ,महाराष्ट्र राज्य ,मंत्रालय ,मुंबई
सर्व प्रशासनिक विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व सहसचिव/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी) मशि-२/साशि-१ ,(उच्च व तंत्र शिक्षण विभाग ,मंत्रालय ,मुंबई
निवड नस्ती (तांशि-४)